नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज
YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

| वर्ष - ४ रे Year - 4rd | अंक - ११० Issue - 110 | वार - सोमवार दि. १४ सप्टेंबर २०२६ Blow- Monday Date 14 SEPTEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# भारतीय महिला क्रिकेट संघाने पटकावले विक्रमी आठव्यांदा आशिया चषकाचे विजेतेपद

## शफाली-मंधानाचा धडाका, श्री चरणीच्या फिरकीची जादूई स्पेल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

दुबई : भारतीय महिला क्रिकेट संघाने पुन्हा एकदा आशियाई क्रिकेटवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महिला आशिया चषक २०२६च्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेचा तब्बल ७२ धावांनी पराभव करत विक्रमी आठव्यांदा आशिया चषकाचे विजेतेपद पटकावले. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारताच्या फलंदाज आणि गोलंदाजांनी एकत्रितपणे शानदार कामगिरी करत श्रीलंकेला कोणतीही संधी दिली नाही.

शफाली-मंधानाची वादळी सलामी

नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीला आलेल्या शफाली वर्मा आणि स्मृती मंधाना यांनी सुरुवातीपासूनच श्रीलंकेच्या गोलंदाजांवर आक्रमण केले. दोघींनी पहिल्या विकेटसाठी तब्बल १२९ धावांची भागीदारी करत भारताला मजबूत सुरुवात करून दिली. शफालीने अवघ्या २४ चेंडूत अर्धशतक झळकावत महिला टी-२० आशिया चषकाच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतकाची नोंद केली. तिने ३९ चेंडूत ६८ धावांची आक्रमक खेळी केली, तर मंधानाने ३९ चेंडूत ५९ धावा केल्या.(थेशप ी ेळर ऊीं २०२६)

या दमदार सुरुवातीच्या जोरावर भारताने २० षटकांत ५ बाद १८३ धावा उभारल्या. त्यामुळे श्रीलंकेसमोर विजयासाठी १८४ धावांचे मोठे लक्ष्य होते.

श्री चरणीच्या फिरकीसमोर श्रीलंका ढेपाळली

लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या श्रीलंकेला भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच दबावाखाली ठेवले. श्री चरणीने ४ बळी घेत श्रीलंकेच्या फलंदाजीचा कणा मोडला. तिच्यासोबत दीप्ती शर्मानेही प्रभावी गोलंदाजी करत ३ बळी मिळवले. भारतीय फिरकीसमोर श्रीलंकेच्या फलंदाजांना मोठी भागीदारी करता आली नाही. अखेर श्रीलंकेचा डाव १११ धावांत आटोपला आणि भारताने ७२ धावांनी दणदणीत विजय मिळवला.

या विजयासह भारताने २०२४च्या अंतिम सामन्यात श्रीलंकेकडून झालेल्या पराभवाची परतफेडही केली. महिला आशिया चषकाच्या इतिहासात भारताचे हे आठवे विजेतेपद असून, या स्पर्धेवरील भारतीय संघाचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. फलंदाजीत शफाली-मंधानाची फटकेबाजी आणि गोलंदाजीत श्री चरणी-दीप्तीची फिरकी या विजयाची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली.



भारतीय महिला क्रिकेट संघाने या स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत अंतिम सामन्यातही आपली सर्वोत्तम बाजू दाखवली. आता या ऐतिहासिक विजयानंतर भारतीय महिला क्रिकेटच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# आ. सचिन दादा कल्याणशेट्टी यांची अक्कलकोट तालुक्यातील दुष्काळसदृश्य गावांची जिल्हाधिकाऱ्यांसह प्रत्यक्ष पाहणी !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी /अक्कलकोट : अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात अल निनोच्या प्रभावामुळे निर्माण होऊ शकणाऱ्या संभाव्य दुष्काळसदृश्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर आज विधानसभा क्षेत्रातील अनेक गावांची मा. जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्या समवेत आमदार सचिन दादा कल्याणशेट्टी यांनी पाहणी केली. पाऊस कमी झाला, तर त्याचा सर्वाधिक परिणाम शेतकरी आणि ग्रामीण भागावर होणार आहे. त्यामुळे परिस्थिती गंभीर होण्याची वाट न पाहता प्रशासनाने आत्तापासूनच नियोजन करणे गरजेचे आहे.



या पाहणीदरम्यान पाणीसाठा, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता, शेतीसाठी पाण्याची परिस्थिती तसेच संभाव्य टंचाईच्या पार्श्वभूमीवर करावयाच्या उपाययोजनांचा आढावा घेतला. शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत अडचणीला सामोरे जावे लागू नये, यासाठी प्रशासनाने आवश्यक ती तयारी ठेवावी, अशी सूचना केली. अक्कलकोटच्या शेतकऱ्यांच्या आणि नागरिकांच्या प्रश्नांकडे केवळ संकट आल्यानंतर पाहण्याऐवजी संकट येण्यापूर्वीच उपाययोजना करणे, हीच आपली भूमिका आहे.

यावेळी प्रांताधिकारी श्री. सुमित शिंदे, तहसीलदार श्री. किरण जमदांडे, तहसीलदार श्री. विनायक मगर, जिल्हा कृषी अधिकारी श्री. शुक्राचार्य भोसले, तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर श्री. अवधूत मुळे, तालुका कृषी अधिकारी, अक्कलकोट श्री. चंद्रकांत मंगरुळे, कृषी सभापती, सोलापूर जिल्हा परिषद श्री. रामप्पा चिवडशेट्टी, सभापती, दक्षिण सोलापूर पंचायत समिती श्री. संदीप टिळे, उपसभापती सौ. वर्षा पटणे, जिल्हा परिषद सदस्य श्री. नेताजी खंडागळे, जिल्हा परिषद सदस्य श्री. विकास बुळ्ळा, जिल्हा परिषद सदस्य श्री. सिद्धाराम शिवमूर्ती, पंचायत समिती सदस्य श्री. विजयकुमार राठोड, पंचायत समिती सभापती, अक्कलकोट सौ. रश्मी हिप्परगी, पंचायत समिती सदस्य श्री. विनोद मोरे, पंचायत समिती सदस्य श्री. आप्पासाहेब किवडे, नगराध्यक्ष, अक्कलकोट श्री. मिलन कल्याणशेट्टी, उपनगराध्यक्ष श्री. बंटी राठोड, सभापती, दुधनी कृषी उत्पन्न बाजार समिती श्री. सिद्धाराम बाके, उपसभापती श्री. निंगाप्पा पुजारी, संचालक, सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समिती श्री. केदार विभुते, नगरसेवक श्री. महेश हिडोळे, नगरसेवक श्री. देविदास कवटगी उपस्थित होते.


# स्टेजवर मोहसीन नक्वी दिसले, टीम इंडियाचा ट्रॉफी घेण्यास नकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भारतीय पुरुष संघाने गेल्या वर्षी जे केले, त्याचीच पुनरावृत्ती भारतीय महिला संघाने यंदाच्या आशिया कपमध्ये केली आहे. आशिया कप २०२६ जिंकल्यानंतर भारतीय महिला संघाने पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे (झउइ) अध्यक्ष आणि आशियाई क्रिकेट परिषदेचे (उउ) अध्यक्ष मोहसिन नक्वी यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यास नकार दिला. या निर्णयानंतर क्रिकेट विश्वात चर्चेला उधाण आले असून, आता भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (इउउख) आपली भूमिका स्पष्ट केली आहे.

मोहसिन नक्वीकडून ट्रॉफी घेण्यास नकार

दुबईत झालेल्या आशिया कपच्या अंतिम सामन्यानंतर भारतीय महिला संघाने ट्रॉफी स्वीकारताना मोहसिन नक्वी यांच्यापासून अंतर राखले. भारतीय पुरुष संघाने २०२५ मध्ये आशिया कप जिंकल्यानंतर घेतलेल्या भूमिकेशी महिला संघाचा हा निर्णय मिळताजुळता आहे. बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया यांनी हरमनप्रीत कौर आणि संघाच्या निर्णयाचे समर्थन केले. त्यांनी स्पष्ट केले की,







महिला संघाने या निर्णयातून भारतीय पुरुष संघाच्या भूमिकेशी एकजूट दाखवली आहे.

सैकिया म्हणाले की, २०२५ मध्ये पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबत कोणतेही संबंध ठेवू नयेत, एवढेच नव्हे तर त्यांच्यासोबत क्रिकेटही खेळू नये, अशी देशवासीयांची भावना होती. मात्र, बहुराष्ट्रीय स्पर्धेत पाकिस्तानविरुद्ध खेळण्यास सरकारने परवानगी दिली. त्यामुळे सामना खेळणे आणि प्रत्येक गोष्ट स्वीकारणे या दोन वेगळ्या बाबी असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

बीसीसीआयला कोणताही पश्चात्ताप नाही...

देवजीत सैकिया यांनी मोहसिन नक्वी यांच्या पदांवरही भाष्य केले. नक्वी हे एसीसीचे अध्यक्ष आणि पीसीबीचे अध्यक्ष आहेत. त्याचबरोबर ते पाकिस्तान सरकारमध्ये मंत्रीही आहेत. त्यामुळे त्यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारणे योग्य नसल्याची बीसीसीआयची भूमिका असल्याचे सैकिया यांनी सांगितले. महिला संघाने घेतलेल्या निर्णयाबाबत बीसीसीआयला कोणताही पश्चात्ताप नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. सैकिया म्हणाले की, आमचे मुख्य उद्दिष्ट केवळ ट्रॉफी जिंकणे नाही, तर भारतीय संघाचा विजय निश्चित करणे आहे आणि आम्ही ते साध्य केले आहे. महिला संघाने ट्रॉफी जिंकून आपले काम पूर्ण केले आहे आणि या निर्णयातून त्यांनी पुरुष संघाच्या भूमिकेलाही पाठिंबा दिला आहे.

सामन्याबद्दल बोलायचं झालं तर, भारताने प्रथम फलंदाजी करताना १८३ धावांचा डोंगर उभारला. शेफाली वर्माने ६९ धावांची तुफानी खेळी केली, तर स्मृती मंधानाने ५९ धावांचं अर्धशतक झळकावलं. या दोघींच्या शानदार फलंदाजीच्या जोरावर भारताने श्रीलंकेसमोर मोठं आव्हान उभं केलं. या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा डाव अवघ्या १११ धावांवर आटोपला. भारताकडून दीप्ती शर्माने शानदार गोलंदाजी करत चार विकेट्स घेतल्या. श्री चरणीनेही तीन विकेट्स मिळवत श्रीलंकेच्या फलंदाजीची कंबर मोडली. भारताने अखेर ७२ धावांनी विजय मिळवत महिला आशिया कपच्या इतिहासात आठव्यांदा विजेतेपद पटकावलं.

### केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची घोषणा

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त देशात सेवा संकल्प अभियान राबविणार

# २०२९ आधी समान नागरी कायद्याची अंमलबजावणी करु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर आले आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अमित शाह यांनी एकत्रित पत्रकार परिषद घेतली. यावेळी त्यांनी सेवा संकल्प अभियान राबवणार असल्याची घोषणा केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने देशात सेवा संकल्प अभियान राबवले जाणार आहे. या योजनेच्या माध्यमातून विविध विकासकामे केली जाणार आहेत. तसेच सरकारने केलेल्या विविध विकासकामांची माहिती या अभियानातून दिली जाणार आहे. एनडीए सरकारने केलेल्या विविध विकासकामे आणि घेतलेल्या निर्णयांची माहिती देत असताना अमित शाह यांनी मोठी घोषणा केली. २०२९ आधी देशातील एनडीशासित २१ राज्यांमध्ये समान नागरी कायदा लागू करु, अशी घोषणा अमित शाह यांनी केली. राष्ट्रीय सुरक्षेत कलम ३७० आणि कलम ३५ (अ) हटवण असंभव मानलं जात होतं. रक्ताचा एक थेंब न सांडता, एकही गोळी न चालवता, कलम ३७० आज भूतकाळ म्हणून उभे आहे. काश्मीर पूर्णपणे भारतासोबत जोडलेला आहे. तीन तलाक कायदा करुन मुस्लीम महिलांना समान अधिकार दिला. अनेक राज्यांत आम्ही समान नागरी कायदा इन्ट्रोड्यूस केला आहे. मला विश्वास आहे की, भाजप-एनडीए शासित २१ राज्यांमध्ये आम्ही २०२९ सालाआधी समान नागरी कायद्याची अंमलबजावणी करु, अशी घोषणा अमित शाह यांनी केली. भारताने पाच दशकांपासूनच्या नक्षलवादाला समाप्त केलं आहे. उत्तर पूर्वेत १४ पेक्षा जास्त शांती करार झाले आहेत आणि ९ हजार पेक्षा जास्त लोकांना सरेंडर करुन आज उत्तर-



पूर्वेला विकासाच्या रस्त्यावर घेऊन गेलो आहोत. सर्जिकल स्ट्राईक, एअर स्ट्राईक आणि ऑपरेशन सिंदूरने दहशतवादाप्रती शुन्य सहिष्णूताची स्थिती स्थापित केली आहे आणि अनेक क्षेत्रांना सुरक्षेला प्राधान्य देण्याचं काम झालं आहे, असं अमित शाह म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासनाचे प्रमुख म्हणून २५ वर्षे कारकीर्द पूर्ण केली आहे. राज्याच्या आणि देशाच्या प्रमुख पदावर सलग २५ वर्षे राहण्याचा रेकॉर्ड त्यांनी केला आहे. गेली १२ वर्षे भारताचे पंतप्रधान म्हणून ज्या प्रकारची प्रगती त्यांनी केली आहे ती आपण जवळून पाहिली आहे. म्हणूनच ही २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक निर्णय सर्वांनी मिळून घेतला आहे. मोदींच्या प्रमुख पदांवरील २५ वर्षे झाल्याच्या प्रत्यर्थ सेवा संकल्प अभियान चालवायचा, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मोदींच्या एकूण कारकीर्दीत सेवाभाव हा त्यांच्या राजकारणाचा स्थायी भाव राहिलेला आहे. राजकारणापेक्षा सेवाकारण आणि गरीब कल्याण अजेंडा त्यांनी सातत्याने चालवला आहे. त्यामुळे हे निमित्त साधून सरकार आणि पक्ष जनतेमध्ये जावून सेवेची कामे करतील, अशाप्रकारची संकल्पना तयार करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनानेदेखील सेवा संकल्प अभियानाच्या निमित्ताने जे वेगवेगळे कार्यक्रम घेतलेले आहेत त्याचा एकत्रित शासन निर्णय काढलेला आहे. हा प्रत्येक कार्यक्रम सामान्यातील सामान्य माणासाच्या जीवनात परिवर्तन घडवून आणणारा आहे. त्यासोबत समाजात मोदींच्याप्रती आत्मीयता प्रकट करण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे, अशी देखील माहिती फडणवीसांनी दिली.

# मणिपूरमध्ये पुन्हा हिंसाचार उफाळला, चार जणांचा मृत्यू; सहा वर्षांच्या मुलालाही गोळी लागली

मणिपूर : मणिपूरच्या तामेंगलोंग जिल्ह्यात नुकत्याच झालेल्या हिंसाचारात एका जोडप्यासह चार जणांचा मृत्यू झाला. या हिंसाचारात एक सहा वर्षांचा मुलगाही जखमी झाला. मणिपूरच्या तामेंगलोंगमध्ये सशस्त्र गुन्हेगारांनी केलेल्या दोन वेगवेगळ्या हल्ल्यांमध्ये एका जोडप्यासह चार जणांचा मृत्यू झाला आणि एका सहा वर्षांच्या अल्पवयीन मुलाला गोळ्या लागल्या. या दोन्ही घटना आज (१३ सप्टेंबर) तामेंगलोंग जिल्ह्यात घडल्या.

पोलिसांनी सांगितले की, पहिली घटना मणिपूरच्या तामेंगलोंग जिल्ह्यातील कैमाई पोलीस ठाण्याच्या हद्दीतील तोलोन गावात पहाटे साडे पाचच्या सुमारास घडली. अधिकाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, ४६ वर्षीय लिंगझांगाई सिंगसिट यांचा जागीच मृत्यू झाला, तर त्यांचे पती सेनेह सिंगसिट आणि त्यांच्या सहा वर्षांच्या मुलाला गोळ्या लागल्या. मात्र, सेनेह सिंगसिट यांचा नंतर उपचारादरम्यान मृत्यू झाला, तर सहा वर्षांच्या मुलाची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. हल्ल्यातील गुन्हेगारांची ओळख पटवण्यासाठी तपास सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. अद्याप कोणत्याही गटाने जबाबदारी स्वीकारलेली नाही. जखमींवर उपचार सुरू आहेत.

## संपादकीय....

### विक्रमी विजय

भारतीय महिला क्रिकेट संघाने पुन्हा एकदा आशियाई क्रिकेटवर आपले वर्चस्व सिद्ध केले आहे. महिला आशिया चषक २०२६च्या अंतिम सामन्यात भारताने श्रीलंकेचा तब्बल ७२ धावांनी पराभव करत विक्रमी आठव्यांदा आशिया चषकाचे विजेतेपद पटकावले. दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात भारताच्या फलंदाज आणि गोलंदाजांनी एकत्रितपणे शानदार कामगिरी करत श्रीलंकेला कोणतीही संधी दिली नाही. नाणेफेक जिंकून भारताने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. सलामीला आलेल्या शफाली वर्मा आणि स्मृती मंधाना यांनी सुरुवातीपासूनच श्रीलंकेच्या गोलंदाजांवर आक्रमण केले. दोघींनी पहिल्या विकेटसाठी तब्बल १२९ धावांची भागीदारी करत भारताला मजबूत सुरुवात करून दिली. शफालीने अवघ्या २४ चेंडूत अर्धशतक झळकावत महिला टी-२० आशिया चषकाच्या इतिहासातील सर्वात वेगवान अर्धशतकाची नोंद केली. तिने ३९ चेंडूत ६८ धावांची आक्रमक खेळी केली, तर मंधानाने ३९ चेंडूत ५९ धावा केल्या. या दमदार सुरुवातीच्या जोरावर भारताने २० षटकांत ५ बाद १८३ धावा उभारल्या. त्यामुळे श्रीलंकेसमोर विजयासाठी १८४ धावांचे मोठे लक्ष्य होते. लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी मैदानात उतरलेल्या श्रीलंकेला भारतीय गोलंदाजांनी सुरुवातीपासूनच दबावाखाली ठेवले. श्री चरणीने ४ बळी घेत श्रीलंकेच्या फलंदाजीचा कणा मोडला. तिच्यासोबत दीप्ती शर्मानेही प्रभावी गोलंदाजी करत ३ बळी मिळवले. भारतीय फिरकीसमोर श्रीलंकेच्या फलंदाजांना मोठी भागीदारी करता आली नाही. अखेर श्रीलंकेचा डाव १११ धावांत आटोपला आणि भारताने ७२ धावांनी दणदणीत विजय मिळवला. या विजयासह भारताने २०२४च्या अंतिम सामन्यात श्रीलंकेकडून झालेल्या पराभवाची परतफेडही केली. महिला आशिया चषकाच्या इतिहासात भारताचे हे आठवे विजेतेपद असून, या स्पर्धेवरील भारतीय संघाचे वर्चस्व पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. फलंदाजीत शफाली-मंधानाची फटकेबाजी आणि गोलंदाजीत श्री चरणी-दीप्तीची फिरकी या विजयाची प्रमुख वैशिष्ट्ये ठरली. भारतीय महिला क्रिकेट संघाने या स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी करत अंतिम सामन्यातही आपली सर्वोत्तम बाजू दाखवली. आता या ऐतिहासिक विजयानंतर भारतीय महिला क्रिकेटच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

# हातात कात्री, मनात जिद्द अन् डोळ्यांत स्वप्न; अभिमन्यूंच्या सलूनने बदलली जगण्याची दिशा

## बँक ऑफ इंडिया आरसेटीच्या प्रशिक्षणाने दिला आत्मविश्वास; ७५ हजारांच्या स्वभांडवलातून उभारला व्यवसाय, आज दरमहा ४० हजारांचे उत्पन्न

हातात कात्री... समोर ग्राहक... आणि मनात एकच विचार-आपल्या हातातील कौशल्याला व्यवसायाची जोड देऊन स्वतःच्या पायावर उभे राहायचे! मोहोळ तालुक्यातील औंढी या छोट्याशा गावातील अभिमन्यू दिलीप चव्हाण यांच्या आयुष्याची कहाणी अशीच आहे. परिस्थिती प्रतिकूल होती, आर्थिक अडचणी होत्या; मात्र मनात स्वतःचा व्यवसाय उभा करण्याची जिद्द होती. या जिद्दीला योग्य प्रशिक्षणाची जोड मिळाली आणि एका छोट्याशा गावातील तरुण आज यशस्वी सलून व्यावसायिक म्हणून उभा आहे.

अभिमन्यू चव्हाण यांचे वय अवघे ३३ वर्षे. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती बेताची. रोज मिळणाऱ्या कामावर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालायचा. दुसऱ्यांकडे काम करून मिळणाऱ्या उत्पन्नाला मर्यादा होत्या. त्यामुळे 'आपले काहीतरी स्वतःचे असावे' हा विचार त्यांच्या मनात सतत घोळत होता. मात्र, व्यवसाय सुरू करायचा तर कौशल्य, भांडवल आणि योग्य मार्गदर्शनाची गरज होती. याच शोधात त्यांना बीओआय स्टार आरसेटी, सोलापूरची वाट सापडली.

प्रशिक्षणाने बदलला आत्मविश्वास

१७ जुलै २०२४ ते १५ ऑगस्ट २०२४ या कालावधीत त्यांनी आरसेटीमध्ये 'मेन्स पार्लर आणि सलून उद्यमी' या विषयाचे प्रशिक्षण घेतले. प्रशिक्षणाच्या सुरुवातीला मनात काहीशी धाकधूक होती. या क्षेत्रात आपण यशस्वी होऊ का? ग्राहक आपल्यावर विश्वास ठेवतील का? व्यवसाय चालेल का? असे अनेक प्रश्न होते. मात्र, प्रशिक्षण जसजसे पुढे गेले तसतसा आत्मविश्वास वाढत गेला. केस कापण्याच्या विविध पद्धती, ग्राहकांच्या गरजा समजून घेणे, ग्राहकांशी संवाद साधणे, स्वच्छता व ग्राहक सेवा, व्यवसायाचे नियोजन आणि व्यवस्थापन अशा विविध बाबींचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण मिळाले. कौशल्याला प्रशिक्षणाची आणि प्रशिक्षणाला आत्मविश्वासाची जोड मिळाली. हाच अभिमन्यू यांच्या आयुष्यातील टर्निंग पॉइंट ठरला.

'नोकरी नको, स्वतःचा व्यवसाय हवा!'

प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. स्वतःच्या बचतीतून ७५ हजार रुपये उभे केले आणि १३ मे २०२५ रोजी स्वतःचे सलून सुरू केले.

सुरुवातीला ग्राहक कमी होते. मात्र, प्रत्येक ग्राहकाला चांगली सेवा देण्याचा त्यांनी निर्धार केला. कौशल्यपूर्ण काम, स्वच्छता, नम्र वागणूक आणि ग्राहकांचे समाधान यामुळे हळूहळू ग्राहकांची संख्या वाढू लागली. ग्राहकांच्या माध्यमातूनच



त्यांच्या व्यवसायाची ओळख परिसरात पोहोचली.

आज काही महिन्यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांनंतर अभिमन्यू यांच्या व्यवसायाने चांगली उभारी घेतली आहे. त्यांना दरमहा सुमारे ४० हजार रुपये उत्पन्न मिळत आहे. एवढेच नव्हे तर स्वतःपुरता रोजगार निर्माण न करता त्यांनी एका युवकाला रोजगाराची संधी उपलब्ध करून दिली आहे.

'आरसेटीने मला फक्त व्यवसाय नाही, आत्मविश्वास दिला'

आपल्या यशाबद्दल बोलताना अभिमन्यू चव्हाण यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसते.बँक ऑफ इंडिया आरसेटीने ग्रामीण भागातील आमच्यासारख्या तरुणांसाठी खूप मोठी संधी उपलब्ध करून दिली. येथे मिळणारे प्रशिक्षण केवळ व्यवसाय शिकवत नाही, तर स्वतःच्या पायावर उभे राहण्याचा आत्मविश्वास देते. या प्रशिक्षणामुळेच माझ्या आयुष्याला नवी दिशा मिळाली, असे ते कृतज्ञतेने सांगतात.

आता स्वप्न मोठे आहे...

७५ हजार रुपयांच्या स्वभांडवलातून सुरू झालेला हा व्यवसाय आता अभिमन्यू यांच्या मोठ्या स्वप्नांचा आधार बनला आहे. सलूनचा विस्तार करून ग्राहकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचे त्यांचे स्वप्न आहे. एका छोट्याशा गावातून सुरू झालेली ही वाटचाल केवळ एका तरुणाच्या आर्थिक उन्नतीची कहाणी नाही; ती जिद्द, कौशल्य, प्रशिक्षण आणि आत्मविश्वास यांच्या संगमातून घडलेल्या परिवर्तनाची कथा आहे. 'परिस्थिती बदलण्याची वाट पाहत बसण्यापेक्षा परिस्थिती बदलण्यासाठी स्वतः एक पाऊल पुढे टाकायचे'-अभिमन्यू चव्हाण यांची ही कहाणी ग्रामीण भागातील अनेक तरुणांना स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची प्रेरणा देणारी ठरते.

अभिमन्यूंच्या यशाची आकडेवारी

प्रशिक्षण : मेन्स पार्लर आणि सलून उद्यमी

प्रशिक्षण संस्था : बीओआय स्टार आरसेटी, सोलापूर

प्रायोजक बँक : बँक ऑफ इंडिया

प्रशिक्षण कालावधी : १७ जुलै २०२४ ते १५ ऑगस्ट २०२४

व्यवसाय सुरू : १३ मे २०२५

स्व-गुंतवणूक : ७५ हजार रुपये

सध्याचे मासिक उत्पन्न : सुमारे ४० हजार रुपये

निर्मित रोजगार : १ युवक.

(संदर्भ आरसेटी चा सन २०२५-२६ चा रिपोर्ट)

-जिल्हा माहिती कार्यालय सोलापूर

# सोलापूर जिल्ह्यामध्ये राष्ट्रीय लोकअदालत यशस्वीपणे संपन्न



सोलापूर दि.१३ (जिमाका) :- मा. राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली, मा. महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशान्वये तसेच मा. अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, सोलापूर श्री. मनोज शर्मा यांच्या मार्गदर्शनाखाली दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी सोलापूर जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये या वर्षामधील तिसऱ्या राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले. सोलापूर मुख्यालयातील न्यायालये तसेच सोलापूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालत घेण्यात आले. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ३४ हजार ६९६ प्रलंबित प्रकरणे आणि ३४ हजार ७४९ दाखलपूर्व प्रकरणे अशी एकूण ६९ हजार ४४५ प्रकरणे लोकआदालतीमध्ये ठेवण्यात आली. या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये सोलापूर जिल्हयातील एकुण १ हजार ७४२ प्रलंबित प्रकरणे सामंजस्याने निकाली काढण्यात आली. लोकअदालतीच्या माध्यमातून एकूण रक्कम रु. ३७,९२,१८,६७९/- इतके मुल्य असणाऱ्या प्रलंबित प्रकरणांमध्ये सामजस्याने तडजोड करण्यात आली. तसेच लोकअदालतीच्या एका स्वतंत्र पॅनलसमोर असलेल्या एकुण ३४ हजार ७४९ दाखलपूर्व प्रकरणांपैकी ११,७७,०१,४३९/- मूल्य असणाऱ्या २७२८ प्रकरणांमधे यशस्वी तडजोड झाली.

विशेष म्हणजे सोलापूर येथील मोटार अपघात न्यायाधिकरणासमोरील प्रकरणाचा तडजोडीने निपटारा झाला. या प्रकरणात 'गो डिजीटल जनरल इन्शुरन्स' कंपनीच्या संवेदनशील पदाधिकारी व विधीज्ञांच्या सहकार्याने तडजोड घडली व दि. २६ सप्टेंबर २०२५ रोजी झालेल्या मोटार अपघातात जीव गमावलेल्या कमावत्या मुलाच्या आई, पत्नी व मुलगी यांना एका वर्षाच्या आत रु. ७१,००,०००/- इतकी भरघोस नुकसानभरपाई देण्यात आली. या प्रसंगी माननीय प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मनोज शर्मा यांच्या हस्ते विमा कंपनीचे अधिकारी, विधीज्ञ व मृतकाचे वारस यांना प्रतिकात्मक धनादेश देण्यात आला व त्यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी मृतकाच्या ८६ वर्षे वयाच्या आईच्या आनंदाश्रुंनी वातावरण भावविभोर झाले होते. अशाच प्रकारे सुमारे १४० भूखंडधारकांचा एक दावा, अपघाताच्या दुसऱ्या प्रकरणातील रु. ४०,००,०००/- नुकसानभरपाई व आणखी एका दाव्यात झालेली रु. ४७,००,०००/- ची तडजोड ही या लोकअदालतीची विशेष वैशिष्ट्ये ठरलीत.

यावेळी अपघाताने झालेली जीवितहानी किंवा दुखापत जरी कशानेही भरुन निघणारी नाही, तरी पक्षकारांना मिळालेली नुकसानभरपाईची रक्कम नक्कीच त्या त्या कुटुंबाची भविष्यातील चिंता दूर करेल आणि त्यात जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूरची महत्त्वाची भूमिका तसेच आपले कर्तव्य बजावेल असे मत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. श्री. मनोज शर्मा यांनी केले.

सदर लोकअदालतीमध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच विविध बँका, वित्तिय संस्था, बीएसएनएल, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी इ. यांची दाखलपूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली होती. तसेच शहर वाहतूक शाखा, तसेच विविध पोलिस ठाण्यात नोंद असलेल्या गुन्ह्यांच्या कबुलीसाठी देखील दोन न्यायालये कार्यरत होती.

सदर लोक अदालत यशस्वी करण्यासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव, श्री अमोलकुमार देशपांडे यांच्या मार्गदर्शनाखाली पॅनल विधिज्ञ, कर्मचारी वृंद, तसेच जिल्हा न्यायालयीन कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले.

स्पेशल ड्राईव्ह

राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजनापूर्वी दि. ०७ सप्टेंबर २०२६ ते दि. ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीमध्ये सोलापूर जिल्हयातील सर्व न्यायालयामध्ये विशेष मोहिम राबविण्यात आली. विशेष मोहिमेमध्ये एकुण २ हजार १९३ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

लोकन्यायालयाची मुद्देसुद माहिती खालीलप्रमाणेः

प्रलंबित प्रकरणे

एकूण ठेवलेली प्रलंबित प्रकरणे ३४६९६

एकूण तडजोड झालेली प्रलंबित प्रकरणे- १,७४२

प्रलंबित प्रकरणातील तडजोड रक्कम - २६,१५,१७,२४०/-

दाखलपूर्व प्रकरणे

एकूण ठेवलेली दाखलपूर्व प्रकरण - ३४,७४९/-

एकूण तडजोड झालेली दाखलपूर्व प्रकरणे- २,७२८-/

दाखलपूर्व प्रकरणातील तडजोड रक्कम ११,७७,०१,४३९/-

जोड झालेली वैवाहिक प्रकरणे - २

**जिल्हा / तालुका निहाय प्रकरणांची माहिती :**

तालुका विधी सेवा समितीचे नांव- सोलापूर- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

१०७० - एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- २१२१३५४१७/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- अक्कलकोट- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

११८७- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- ५२९०५६२/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- बार्शी- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

९१०- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- २६२९६६९१/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- माढा- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

३९- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- ९०३६००/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- मोहोळ- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

५१- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- ३७८७७२५/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- माळशिरस- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

२०६- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- १५८१०७४६/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- मंगळवेढा- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

१६१- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- १४४३७११४/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- पंढरपूर- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

१८१- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- ७३९४२०७९/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- करमाळा- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

२६३- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- ५४८३६८२/-

तालुका विधी सेवा समितीचे नांव- सांगोला- एकूण तडजोड झालेली प्रकरणे-

४२९- एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम- २११३१०६३/-

एकूण तडजोड झालेली प्रकरणे - ४४७०

एकूण प्रकरणातील तडजोड रक्कम-३७९२१८६७९/-

**राष्ट्रीय लोकअदालतीचे यशस्वी यशोगाथा-**

मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, सोलापूर श्री. मनोज एस. शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हा व त्या अंतर्गत सर्व तालुक्यात सन २०२६ मधील तिसरे राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. सदरची लोकअदालत न्यायदानाच्या प्रक्रियेतील एक सुवर्ण पान ठरले आहे. या लोकअदालतीच्या माध्यमातून केवळ प्रलंबित खटल्यांचा निपटारा झाला नसून न्याय आणि सहानुभूतीचा सुरेख संगम साधत अनेक कुटुंबाच्या आयुष्यात आशेचा नवा किरण निर्माण झाला आहे. कायदयाच्या चौकटीत राहून समोपचाराने आणि संवादाना क्लिष्ट वाद कसे सोडविले जाउ शकतात, याचे अत्यंत प्रेरणादायी दर्शन या मंचावर घडले. खालील यशोगाथा या प्रक्रियेची सार्थकात सिध्द करतात.

१) पोरक्या घराला कायद्याची सावलीः ७१ लाखांची मदत

२६ सप्टेंबर २०२५ च्या रात्री ८ वाजता घडलेल्या त्या भीषण अपघाताने एका हसत्याखेळत्या कुटुंबावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळला. राज्य परिवहन (एस.टी.) महामंडळात प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या एका कर्तबगार सुपुत्राचा आणि कुटुंबाच्या एकमेव आधारवड्याचा यात दुर्दैवी अंत झाला. या आघाताने पत्नीचे कुंकू पुसले गेले, दोन मुलांच्या डोक्यावरचे पितृछत्र हरवले आणि ८६ वर्षांच्या वयोवृद्ध मातेवर वयाच्या उत्तरार्धात पोरके होण्याची दुर्दैवी वेळ आली. नियतीच्या या क्रूर खेळानंतर हतबल झालेल्या या कुटुंबाच्या अस्तित्वाची आणि न्याय मिळवण्याची एक भावनिक लढाई सुरु झाली.

सरतेशेवटी, लोकअदालतीच्या माध्यमातून या संघर्षाला यश आले आणि न्यायव्यवस्थेने या दुःखी कुटुंबाच्या पारड्यात न्यायाचे माप टाकले. विरोधी पक्ष असलेल्या 'गो डिजिट जनरल इन्शुरन्स' कंपनीकडून या निराधार कुटुंबाला तब्बल ७१ लाख रुपयांची नुकसानभरपाई मिळवून देण्यात आली. ही आर्थिक मदत गेलेल्या माणसाची जागा कधीच घेऊ शकणार नाही, पण त्या वयोवृद्ध मातेच्या आणि मुलांच्या भविष्यासाठी ती नक्कीच एक भक्कम ढाल बनेल.

नियतीने हिरावून घेतलेल्या आनंदानंतर, अंधारलेल्या घरात कायद्याने दिलेला हा आशेचा किरण म्हणजेच सत्याच्या विजयाची ही एक दिलासादायक यशोगाथा आहे. सदर प्रकरण तडजोड घडवून आणणेकरीता जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश, सोलापूर श्री. मनोज एस. शर्मा यांचे मागदर्शनाखाली पॅनल प्रमुख श्री. एस. डी. इंदलकर, पॅनल विधीज्ञ श्री. एल. बी. पाटील यांनी मोलाची भुमिका पार पाडली. या प्रकरणात अर्जदारातर्फे ॲड. रुपेश महिंद्रकर तर विमा कंपनीतर्फे ॲड. जी. एच. कुलकर्णी तर ॲड. वैभव कुलकर्णी यांनी काम पाहिले.

२) आशेची नवी पहाटः अपंगत्वाच्या अंधारात ४० लाखांचा कायदेशीर आधार

रस्ता ओलांडताना अचानक काळाने झडप घातली आणि एका भीषण धडकेने एका सामान्य माणसाचे आयुष्य एका क्षणात उद्ध्वस्त केले. या दुर्दैवी अपघातात आलेले कायम स्वरूपी अपंगत्वाने त्या व्यक्तीच्या जगण्याच्या उमेदीलाही जबर हादरा दिले.

अपंगत्वामुळे काम करणे अशक्य झाले आणि हतबल झालेल्या कुटुंबासमोर उदरनिर्वाहाचा, दोन वेळच्या भाकरीचा एक अत्यंत गंभीर प्रश्न आ वासून उभा राहिला... अंधारलेल्या या वाटेवर आशेचा किरण शोधताना, न्याय मिळवण्यासाठी 'मोटार अपघात न्यायधिकरणा'चा (चउझ) दरवाजा ठोठावत एका नव्या संघर्षाची सुरुवात झाली.

'आयसीआयसीआय लोम्बार्ड जनरल इन्शुरन्स' (खउखउख डेलरीव) या कंपनीविरुद्धचा हा कायदेशीर लढा खडतर होता, पण जिल्हा विधी सेवा प्राधिकरण सोलापूरच्या मदतीने सत्याची आणि न्यायाची बाजू भक्कम होत गेली. अखेर लोकदलातील मध्ये या अश्रूची दखल घेतली आणि या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्याला एक मोठे व दिलासादायक यश प्राप्त झाले. उदरनिर्वाहाचा प्रश्न सोडवण्यासाठी आणि हक्काचा न्याय म्हणून, विरोधी इन्शुरन्स कंपनीकडून तब्बल ४० लाख रुपयांची नुकसान भरपाई मिळवून देण्यात आली.

अपघातात हरवलेले शारीरिक बळ ही रक्कम परत आणू शकणार नाही, पण भविष्याची चिंता मिटवणारा हा ४० लाखांचा न्याय, त्या कुटुंबासाठी नक्कीच एका नव्या आयुष्याची सुखदायी पहाट ठरेल असे मत प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश मा. श्री. मनोज शर्मा यांनी व्यक्त करत लोकन्यायालयाचा लाभनागरिकांनी घ्यावा असे आवाहन केले. सदर प्रकरण हे आजच्या लोकअदालतमध्ये तदर्थ जिल्हा न्यायाधीश, सोलापूर श्री. एस. डी. इंदलकर यांचे पॅनलवर ठेवले होते. तसेच पॅनल विधीज्ञ श्री. एल. बी. पाटील यांनी काम पाहिले.

३) लोकअदालतीच्या आधारे रखडलेल्या खरेदीखताचा परतावा म्हणून रु. ४७ लाखात यशस्वी तडजोड.

दिवाणी न्यायालय व. स्तर, सोलापूर येथे इसारा पावती प्रमाणे खरेदीखत करुन मिळणेसाठीचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द दाखल केला होता. सदर प्रकरण हे आजच्या लोकअदालतीमध्ये दिवाणी न्यायाधीश श्रीमती. पी. डी. चव्हाण यांचे पॅनलवर नेमण्यात आले होते. सदरच्या प्रकरणात आजरोजी मे. न्यायालयात वादी व प्रतिवादी यांचे वकिल व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव यांनी वादी प्रतिवादी यांचे दरम्यान यशस्वीरीत्या तडजोड घडवून आणली. सदर तडजोडीनुसार प्रतिवादी यांनी वादीस रक्कम रु. ४७ लाख इतक्या रक्कमेचा डी. डी. देवून सदरचे प्रकरण आजरोजी निकाली करण्यात आलेले आहे. सदर लोकअदालतीमध्ये वादी व प्रतिवादी यांना लोकअदालतीचा मोठया प्रमाणात फायदा झाला. आपसामधील वाद-विवाद यशस्वीरीत्या सोडून योग्य व न्यायिक भावनेची जोपसना होणेकामी लोकअदालतीचा मोठया प्रमाणात फायदा होत असल्याची जन सामान्यांमध्ये, सुजान नागरीकांमध्ये भावना व्यक्त होत आहे, त्याचाच एक भाग म्हणून आजचे प्रकरणे यशस्वीरीत्या वादी व प्रतिवादी, त्यांचे विधीज्ञ यांचे बोलणे होवून यशस्वीरीत्या संपुष्टात आलेले आहे. या प्रकरणात वादीतर्फे ॲड. आय. बी. पाटील तर विमा कंपनीतर्फे ॲड. जी. एच. कुलकर्णी तर ॲड. वैभव कुलकर्णी यांनी काम पाहिले.

४) १४० भुखंडधारकाच्या सात व्यावसायिक मित्रांच्या वादात यशस्वी तडजोड

सात मित्रांनी मिळून १४० भुखंडाचे लेआऊटप्रमाणे विक्री करीता सदर भुखंडाचे सुशोभिकरण केले. परंतू काही कारणाने ७ मित्रांच्या प्रेमला तडा गेला आणि मैत्रीच्या विश्वासाचे रुपांतर भुखंड वाटपाच्या कारणावरुन थेट प्रकरण दिवाणी न्यायालय, सोलापूर येथे दाखल झाले. सदर प्रकरण लोकन्यायालयात वर्ग केले असता, यामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष मा. श्री. मनोज शर्मा यांचे मार्गदर्शनाखाली व जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव श्री. अमोलकुमार देशपांडे यांचे देखरेखेखाली पॅनल प्रमुख मा. श्री. हंबिरे व पक्षकार यांच्यात तडजोडीच्या मागाने सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चे अंती १४० भुखंडाचे आप-आपसात समोपचाराने विकोपाला गेलेला वाटपाच्या वादावर तोडगा निघाला आणि सरतेशेवटी सात मित्र पुन्हा एकदा मैत्रीच्या धाग्यामध्ये लोकअदालतीच्या आधारे गुंफले गेले.

५) दिव्यांग कर्मचा-याच्या न्यायासाठी न्यायाधीश गेले धावून

राष्ट्रीय लोकअदालतीचे काम काज कामगार न्यायालय येथे चालू असताना एका प्रकरणातील कर्मचारी हा दिव्यांग असून त्यास दोन पायावर चालण अशक्य असल्याचे पॅनल प्रमुख मा. श्री. एन. सी. बोरफळकर यांच्या निर्दशनास आले असता, तात्काळ क्षणाचा विलंब न करता सदर प्रकरणाचे अवलोकन करुन न्यायाधीश व पॅनल सदस्यांनी तात्काळ धाव घेत दिव्यांगाला न्याय मिळवून देत रु. १६ लाखाची नुकसान भरपाई तडजोडीने यशस्वीरीत्या मंजूर करण्यात आली.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# तृतीयपंथी समुदायाला समाजात सन्मान व हक्क मिळावेत : डॉ. सान्वी जेठवानी

## तृतीयपंथीयांचे कल्याण आणि हक्क संरक्षण: माहिती, प्रसारण व जनजागृती यावर कार्यशाळा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर: समाजातील प्रत्येक उपेक्षित घटकाला आता मान-सन्मान मिळू लागला असला, तरी तृतीयपंथी व्यक्तींना आजही दुजाभावाची वागणूक दिली जात आहे. केंद्र व राज्य शासनाने अनेक कायदे आणि शासन निर्णय करूनही त्यांची प्रत्यक्षात काटेकोर अंमलबजावणी होत नाही, अशी खंत महाराष्ट्र राज्य ट्रान्सजेंडर हक्क संरक्षण व कल्याण मंडळाच्या सह-उपाध्यक्षा डॉ. सान्वी जेठवानी यांनी व्यक्त केली.

येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात मराठी विभाग, महाराष्ट्र शासन (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग) आणि नांदेडच्या 'सप्तरंगी सेवाभावी संस्थे'च्या संयुक्त विद्यमाने 'तृतीयपंथीयांचे कल्याण आणि हक्क संरक्षण: माहिती, प्रसारण व जनजागृती' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. त्या वेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. जेठवानी बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव होते. व्यासपीठावर विशेष समाजकल्याण कक्ष अधिकारी महादेव शिंदे, उमेश पुजारी, डॉ. सुशील शिंदे व डॉ. आनंद शिंदे उपस्थित होते.

आपल्या भाषणात डॉ. जेठवानी पुढे म्हणाल्या, तृतीयपंथीयांना ओळखून त्यांच्या वैद्यकीय, मानसिक आणि भौतिक गरजा पूर्ण करणारी व्यवस्था सर्व पातळ्यांवर निर्माण व्हायला हवी. रस्त्यावर टाळी वाजवणे आणि भीक मागणे हे सर्व कोणत्याही तृतीयपंथीयाला नको आहे. त्यांना रोजगार, शासकीय अर्थ सहाय्य आणि हक्काचे घर मिळाले तर ते स्वतःच्या पायावर उभे राहून आपली स्वतंत्र आेळख निर्माण करू शकतील. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. बी. टी. जाधव यांनी रयत शिक्षण संस्था उपेक्षित घटकांपर्यंत पोहोचण्यासाठी नेहमीच तत्पर असल्याचे सांगत, तृतीयपंथीयांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आमचे महाविद्यालय सर्वतोपरी प्रयत्न करेल अशी ग्वाही दिली. दिवसभर चाललेल्या या कार्यशाळेत जिल्ह्यातील अनेक तृतीयपंथीयांसह महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. रमेश शिंदे यांनी केले तर आभार डॉ. सुशील शिंदे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका भांगे यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी मराठी विभागातील प्रा.डॉ. दत्तात्रय डांगे, डॉ. बापूसाहेब घोडके, प्रा. हरीभजन कांबळे, प्रा. अंकुश घुले, अभिजीत जाधव, अलकेश यांच्यासह कार्यालयीन सेवकांनी अथक परिश्रम घेतले.

# ईद-ए-मिलादुन्नबी अर्थात पैगंबर जयंतीदिनी मुख्याध्यापकांची मागणी आणि सामाजिक कार्यकर्त्यांचा पुढाकार ५३ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट :ईद-ए-मिलादुन्नबी अर्थात पैगंबर जयंतीनिमित्त २६ ऑगस्ट रोजी नगरपरिषद उर्दू शाळा क्रमांक १ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिरापूर्वी शाळेचे मुख्याध्यापक खालिद खान यांनी शाळेतील गरीब व गरजू विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करून देण्याची मागणी केली होती. या मागणीला सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास व रशीद खिस्तके यांनी सकारात्मक प्रतिसाद देत शनिवारी १२ सप्टेंबर रोजी शाळेतील ५३ विद्यार्थ्यांची रक्तगट तपासणी करून दिली.




सामाजिक बांधिलकी जपत विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचे पालक व शिक्षकांकडून कौतुक करण्यात आले.

यावेळी शाळेचे मुख्याध्यापक खालिद खान,शिक्षक रहीम शेख,नाहिदा शेख,सईदा शेख,शाहीन शेख,शहनाज शेख, नाझिया दंडोती,तसनीम सगरी यांच्यासह शिक्षकवर्ग उपस्थित होता. रक्तगट तपासणी उपक्रमासाठी सहकार्य केल्याबद्दल सिद्धेश्वर ब्लड बँक, सोलापूरचे संचालक सादिक मुजावर, नागेश गाडेकर व अनिल होनराव यांचा शाळेचे मुख्याध्यापक खालिद खान व रहीम शेख सर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.


या उपक्रमासाठी सोहेल फरास, रशीद खिस्तके,नूरू जवळगीकर,सैपन शेख,इलिया शेख,अजीम शेख आदी उपस्थित होते अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली.

# विश्वजीत मोरे यांची अमूलमध्ये एक्झिक्युटिव्ह क्वॉलिटी एश्युरन्स ऑफिसर पदावर निवड

१५ लाखांपेक्षा अधिक वार्षिक पॅकेज; राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

गादेगाव, प्रतिनिधी : आमचे स्नेही तथा गादेगावचे सुपुत्र श्री. विजय तुकाराम मोरे यांचे चिरंजीव विश्वजीत मोरे यांनी आपल्या मेहनत, जिद्द आणि गुणवत्तेच्या जोरावर अभिमानास्पद यश संपादन केले आहे. एम.टेक शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांची देशातील नामांकित दुग्धसंस्था अमूल येथे 'एशलीीेंळींश ीरश्रळीूं ीीीरपलश जषषळलशी' या जबाबदारीच्या पदावर निवड झाली आहे. विशेष म्हणजे त्यांना १५ लाखांपेक्षा अधिक वार्षिक पॅकेज मिळाले असून, ही बाब मोरे कुटुंबासह संपूर्ण गादेगावसाठी अभिमानाची आहे.



विश्वजीत मोरे यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष शरदचंद्र पवार पक्षाच्या उद्योग व व्यापार विभागाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी विश्वजीत यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे आणि मेहनतीचे कौतुक करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनीही उच्च शिक्षण, कौशल्य आणि जिद्दीच्या जोरावर देशातील नामांकित संस्थांमध्ये यश संपादन करावे, याचे विश्वजीत मोरे हे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांच्या या यशामुळे गादेगावच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या सत्कारप्रसंगी अजित मोरे, विजय मोरे, तानाजी बागल, विशाल मोरे, वैभव बागल, शिवाजी बागल, महादेव बागल, बालाजी देशमुख आदी उपस्थित होते.

विश्वजीत मोरे यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी मनःपूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा!

# पंढरपूर आरटीओ कॅम्प च्या लायसन बुकिंग मर्यादित वाढ! नगराध्यक्षा डॉ. प्रणिता ताई भालके यांच्या पाठपुराव्याला यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना महान चालवण्याचा परवाना (लायसन्स) मिळताना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी पंढरपूर आरटीओ कॅम्प मधील कच्चे व पक्के लायसन साठी असलेली ऑनलाइन बुकिंग ची मर्यादा पूर्वीप्रमाणे वाढवण्यात यावीत अशी मागणी पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर सौ प्रणिता ताई भगीरथ भालके यांनी राज्याचे परिवहन मंत्री मा श्री प्रताप सरनाईक यांच्याकडे मागणी केली होती, अखेर त्यांच्या मागणीला यश आले आहे.



त्यामुळे पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना लायसनच्या कच्च्या व पक्क्या चाचणीसाठी ऑनलाईन स्लॉट मिळवणे अधिक सुलभ होणार असून, लायसन्स प्रक्रियेसाठी नागरिकांची होणारी धावपळ व गर्से मोठ्या प्रमाणात कमी होण्यास मदत होणार आहे.

नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी केलेल्या मागणीची तातडीने दखल घेऊन बुकिंग चे मर्यादा वाढवल्याबद्दल परिवहन मंत्री माननीय नामदार प्रताप सरनाईक यांचे मनःपूर्वक आभार पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ प्रणिता ताई भालके यांनी म्हटले आहे. त्यामुळे पंढरपूर तालुक्यातील नागरिकांना लायसन्स कच्च्या व पक्क्या लायसन्स साठी ऑनलाइन मिळवणे अधिक सुलभ होणार असून नागरिकांची होणारी धावपळ व गर्से मोठ्या प्रमाणात कमी होणारे मदत होणार आहे नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी केलेल्या मागणीची तातडीने दखल घेऊन बुकिंगची मर्यादा वाढवल्याबद्दल परिवहन मंत्री मा. ना. प्रताप सरनाईक यांचे मनःपूर्वक आभार असे पंढरपूर नगरपालिका लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर सौ पण येता ताई भगीरथ भालकी यांनी म्हटले, पंढरपूरच्या प्रश्नासाठी सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि यातून मिळवलेले हे यश नागरिकांसाठी दिलासा दायक ठरले आहे.

# वडवली गावातील दिप्ती माळीची मंत्रालय महसूल सहाय्यकपदी निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघ्या जवळील वडवली गावातील कन्या कु. दिप्ती काशिनाथ माळी हिने वयाच्या अवघ्या २६ व्या वर्षी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करत मंत्रालय महसूल सहाय्यक पदावर निवड मिळवली आहे. चार वर्षांच्या अथक परिश्रम, सातत्य आणि जिद्दीच्या जोरावर मिळवलेल्या या यशामुळे वडवली गावाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. दिप्ती हिचे प्राथमिक शिक्षण वडवली गावातील जिल्हा परिषद शाळेत झाले. त्यानंतर माध्यमिक शिक्षण डी. के. सूर्यराव विद्यालय, तळवली ,येथे, तर उच्च माध्यमिक शिक्षण मुरबाड येथील

**चार वर्षांच्या अथक परिश्रमांना एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश; गावातून जंगी मिरवणूक काढून जल्लोष**

न्यू इंग्लिश स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये झाले. पुढे तिने कल्याण येथील बिर्ला महाविद्यालयातून बॅचलर ऑफ कॉम्प्युटर सायन्स (इउड) ही पदवी संपादन केली. पुढे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून राज्यशास्त्र विषयात पदव्युत्तर पदवी पूर्ण केली. बी.एस, सी. (आयटी) पदवीचे शिक्षण पूर्ण केले. त्यानंतर स्पर्धा परीक्षेच्या तयारीसाठी ती पुणे येथे गेली आणि सलग चार वर्षे कठोर परिश्रम घेत अभ्यास केला.

गावातील जिल्हा परिषद शाळेत तयार झालेला शिक्षणाचा पाया आणि त्यावर उभी राहिलेली मेहनतीची इमारत अखेर यशाच्या शिखरावर पोहोचली, असे तिच्या यशातून अधोरेखित झाले आहे. दिप्तीच्या या उल्लेखनीय यशाचा आनंद वडवली ग्रामस्थांनी मोठ्या उत्साहात साजरा केला. तिची संपूर्ण गावातून जंगी मिरवणूक काढण्यात आली. गुलालाची उधळण, फटाक्यांची आतषबाजी आणि जल्लोषाच्या वातावरणात



तिचे स्वागत करण्यात आले. यावेळी ग्रामस्थ, नातेवाईक आणि मित्रपरिवाराने तिच्या यशाचा आनंदोत्सव साजरा करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. दिप्तीच्या यशामागे तिच्या आई-वडिलांचे आशीर्वाद, कुटुंबीयांचा भक्कम पाठिंबा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे. तिचे वडील काशिनाथ माळी हे ग्रामविकास अधिकारी असून, त्यांच्या मार्गदर्शनासह कुटुंबाने दिलेल्या प्रोत्साहनामुळे दिप्तीने स्पर्धा परीक्षेच्या तयारीत सातत्य राखले.

आई-वडिलांचे आशीर्वाद, कुटुंबाचा पाठिंबा आणि शिक्षणाचे बळ हेच यशाचे खरे रहस्य आहे, असा संदेश दीप्तीच्या यशातून विद्यार्थ्यांना मिळत आहे. तिच्या या यशामुळे वडवली गावातील तरुण-तरुणींना स्पर्धा परीक्षांच्या माध्यमातून मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती जिद्दीने पूर्ण करण्याची प्रेरणा मिळाली आहे.

**या क्षेत्रातील स्पर्धा समुद्राएवढी अथांग आहे; मात्र जिद्द, चिकाटी, संयम आणि सातत्य ठेवले तर कोणतेही यश अशक्य नाही. तयारीच्या काळात आई-वडिलांपासून दूर राहावे लागले, अनेक गोष्टींचा आणि सण-उत्सवांचाही त्याग करावा लागला. मात्र स्वतःचा 'कम्फर्ट झोन' सोडल्याशिवाय मोठे यश मिळत नाही..'असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास' या तुकोबारायांच्या विचाराप्रमाणे सातत्याने मेहनत केली. या प्रवासात आई-वडिलांसह कुटुंबीयांनी दिलेल्या पाठिंब्यामुळेच हे यश शक्य झाले. मला मदत आणि मार्गदर्शन करणाऱ्या सर्वांची मी मनापासून आभारी आहे. हे यश शेवट नसून पुढील मोठ्या पदांसाठीची सुरुवात आहे; आता थांबायचं नाही!**

**– दिप्ती काशिनाथ माळी (महसूल सहाय्यक )**

**खामसवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रभाग समितीची आढावा बैठक संपन्न**

**कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या सूचना**

# विकासकामांना गती, 'आपला जीव धाराशिव-व्हिजन २०३०' वर विशेष भर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हनुमंत पाटुळे /खामसवाडी : कळंब तालुक्यातील खामसवाडी येथे पंचायत समिती कळंब अंतर्गत जिल्हा (परिषद गट-खामसवाडी) प्रभाग समितीची मासिक आढावा बैठक दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता प्राथमिक आरोग्य केंद्र खामसवाडी येथे संपन्न झाली.

या प्रसंगी समाज कल्याण समिती, जिल्हा परिषद धाराशिवचे सभापती तथा प्रभाग समिती अध्यक्ष मा. श्री. विश्वास सुमन हनुमंत कोकणे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

बैठकीच्या प्रारंभी शासनाकडून प्राप्त झालेल्या विविध शासन निर्णय, परिपत्रके आणि मार्गदर्शक सूचनांचे वाचन करण्यात आले. त्यानंतर आयत्या वेळी आलेल्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीत प्रभागातील सर्व ग्रामपंचायती अंतर्गत सुरू असलेल्या विकासकामांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. विशेषतः प्रधानमंत्री घरकुल योजना, चठएॠ अंतर्गत सुरू असलेली कामे, नाली सफाई, पाणी पुरवठा योजनांची सद्यस्थिती आणि नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या कामाची प्रगती जाणून घेऊन संबंधित ग्रामपंचायत अधिकारी आणि विभाग प्रमुखांना कामे वेळेत व गुणवत्तापूर्ण पद्धतीने पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना अध्यक्ष मा.विश्वास कोकणे यांनी दिल्या. शासनाच्या विविध कल्याणकारी योजना शेवटच्या पात्र लाभार्थ्यापर्यंत प्रभावीपणे पोहोंचवाव्यात, यावर त्यांनी भर दिला.

'आपला जीव धाराशिव – व्हिजन २०३०' आणि स्वच्छतेवर भर

बैठकीतील महत्त्वाचा विषय ठरला तो 'आपला जीव धाराशिव – व्हिजन २०३०' हा उपक्रम. या व्हिजन अंतर्गत प्लास्टिकबंदीची काटेकोर अंमलबजावणी, घनकचरा व्यवस्थापन, कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने संकलन, वर्गीकरण आणि विल्हेवाट या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



प्रत्येक गावात प्लास्टिकचा वापर कमी करण्यासाठी जनजागृती मोहीम राबवणे, पर्यावरण संवर्धनासाठी वृक्षारोपण आणि स्वच्छतेला प्राधान्य देण्याबाबत ग्रामपंचायतींना सूचना देण्यात आल्या.

सायंकाळी ७ ते ९ टी.व्ही. बंद उपक्रम

याचबरोबर सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या एका आगळ्या उपक्रमाचाही या बैठकीत आढावा घेण्यात आला. सायंकाळी ७.०० ते रात्री ९.०० वाजेपर्यंत टी.व्ही. बंद ठेवून तो वेळ कुटुंबातील सदस्यांसोबत संवाद, मुलांचा अभ्यास, वाचन, खेळ आणि इतर विधायक उपक्रमांसाठी द्यावा, या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी गावोगावी जनजागृती करण्याचे आवाहन करण्यात आले.

या वेळी या आढावा बैठकीतस खामसवाडी गटातील गोविंदपूर, ढोराळा, देवळाली, वडगाव (शि), वाठवडा, माळकरंजा, बोरगाव (बु) आणि खामसवाडी या सर्व ग्राम पंचायतींचे सरपंच, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, महिला व बालकल्याण, ग्रामीण पाणी पुरवठा, सार्वजनिक बांधकाम, आरोग्य, कृषी, पशुसंवर्धन विभागाचे विस्तार अधिकारी, आरोग्य सेवक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, आशा कार्यकर्त्या तसेच सर्व विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बैठकीच्या शेवटी खामसवाडी प्रभागातील विकासकामांना अधिक गती देणे, गावे स्वच्छ व हागणदारीमुक्त करणे आणि 'आपला जीव धाराशिव – व्हिजन २०३०' ची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा एकमुखी निर्धार व्यक्त करण्यात आला. या बैठकीस खामसवाडी परिसरातील पत्रकार बंधू उपस्थित होते.

# खरीप हंगाम वाया; रब्बीसाठी पावसाची प्रतीक्षा



## जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांच्याकडून शेत शिवाराची पाहणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**
प्रतिनिधी/पंढरपूर

सोलापूर जिल्ह्यातील अकरावी तालुक्यामध्ये यंदा पावसाचा फटका बसला असून अनेक भागातून खरीप पिके वाया गेली आहेत. आता रब्बी हंगामाची सुरुवात झाली असली तरी दमदार पावसाची आवश्यकता रब्बी हंगामासाठी लागणार आहे. सोलापूर जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी ५० टक्के पेक्षा कमी पाऊस झाल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी एस किर्तीकेयन जिल्ह्यातील प्रत्यक्ष शिवारात जाऊन पाहणी केली आहे. अक्कलकोट, सांगोला, मंगळवेढा, माळशिरस, विविध तालुक्यातील शेतकऱ्याची संवाद साधून पीक पाणी केली आहे. पावसा अभावी पिके वाया गेली आहेत. रब्बी हंगामासाठी पावसाची असलेली गरज जिल्हाधिकारी समोर मांडले आहे. पावसा अभावी तिकीट धोक्यात आली आहे. खरीप हंगामात पावसाने स्वराधीपासूनच ओढ दिल्याने सोयाबीन ,तूर मूग, उडीद, अन्य पिके पिकांना मोठा फटका बसला आहे. अनेक भागात पिकांची वाढ खुंटली आहे व पावसाळा वेळ पिके करपून गेली आहे. आता शेतकऱ्यांची लक्ष रब्बी हंगामाकडे लागले आहे. मात्र जमिनीमध्ये पुरेसा ओलावा नसल्यामुळे रब्बी जमाती पावसाची गरज आहे.

ऊस पिकावर ही संकट आले ते आहे. सोलापूर जिल्ह्यात ऊस हे महत्त्वाचे नगदी पीक आहे. सिंचनासाठी पाण्याची आवश्यकता असल्याने ऊस पिकही जुळू लागले आहेत. पाऊस नसल्यामुळे उसाच्या वाढीवरही परिणाम झाल्यावर आगामी हंगामा ऊसाला मनाव असे उत्पादन कमी होण्याची शक्यता आहे.

पुणे जिल्ह्यामध्ये पाऊस झाल्यामुळे उजनी धरणामध्ये काही प्रमाणात दिलासा मिळाला असून धरण १००% भरले आहे. त्यामुळे काही प्रमाणात शेतकऱ्यांना सोलापूर जिल्ह्यातील दिलासा मिळाला असला तरी केवळ धरण भरले म्हणून शेतकऱ्यांची परिस्थिती पूर्णपणे सुधारलेली नाही. जिल्ह्यात पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे जमिनीमध्ये भूज पावसाचा ओलावा कमी आहे. भूजल पातळी खालावत आहे त्यामुळे बोर व विहिरींना म्हणाव तशी पाणी नाही. आगामी काळातही पाणीटंचाईची चिंता वाढणार आहे. शेतकऱ्यांची खरी वस्तुस्थिती प्रशासनावरती पोहोचवावे यासाठी प्रत्येक तालुक्यातील शेत शिवाराची पाहणी सोलापूर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी हेच कीर्तीकेयन यांनी दिले आहेत. तहसीलदार तलाठी व कृषी अधिकाऱ्यांना, स्थानिक पातळीवर शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन प्रत्यक्ष पाहणी करून नुकसानीची व सद्यस्थितीच्या पिकाची पाहणी करून संकलित करून अहवाल प्रशासनाकडे सादर करावा. अशी आदेश देण्यात आले आहेत.

### सण उत्सवाबरोबर विकास कामावरही भर; मनसे नेते दिलीप धोत्रे

## गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मनसेच्या माध्यमातून घराघरात पोहोचली गणरायांची मूर्ती

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी /पंढरपूर : गणेश उत्सवाचा उत्सव शिगेला पोहोचत असताना पंढरपूर शहरातील प्रभाग क्रमांक १७ मधील सर्व गणेश भक्तांना महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वतीने सुबक आणि आकर्षकाच्या गणेशाच्या मूर्ती भेट देण्यात आल्या माझे नेते उपक्रम हाती घेण्यात आला होता. भैरवनाथ शुगर चे चेअरमन अनिल दादा सावंत यांच्या हस्ते या उपकर्माचा शुभारंभ झाला.

नगरसेविका माधुरीताई धोत्रे यांच्या लकेरी गल्ली येथील संपर्क कार्यालयातून गणरायाच्या मूर्तीचे वाटप करण्यात आले दिवसभरात प्रभागातील प्रत्येक घरात मनसेच्या कार्यकर्त्यांनी जाऊन मूर्तीचे वाटप केले.

याप्रसंगी बोलताना दिलीप धोत्रे यांनी सण उत्साह जल्लोषात विकास कामे जोमात अशी भूमिका मांडली गणेशोत्सव सर्वसामान्यांच्या श्रद्धेचा आणि आनंदाचा क्षण आहे आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही कुटुंबाच्या गणेशोत्सवाचा आनंद कमी



होऊ नये या उद्देशाने हा उपक्रम हाती घेतल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी प्रभागातील विकास कामांचा आढावाही मांडला व ड्रेनेज आणि पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईन बदलण्याचे काम सुरू असून प्रभागातील रस्ते सिमेंट काँक्रीटचे करण्यासाठी तयार झाले आहेत काही रस्त्याच्या निविदाही पूर्ण झाले आहेत त्यामुळे येत्या काळात रस्त्याच्या निवेदन पूर्ण झाले आहे . त्यामुळे येत्या काळात प्रभागातील रस्ते आणि मूलभूत सुविधा या कामांना गती मिळणार असल्याचे विश्वासात त्यांनी व्यक्त केला आहे.

या पुढील काळात हिंदू मुस्लिम समाजाचे सन सर्व सण उत्साहाने लोकोप्याने आणि उत्साहात साजरे करण्याचा मनसेचा प्रयत्न राहणार असल्याचे सांगत पंढरपूर शहरात एकही तरुण बेरोजगार राहू नये व नागरिक सुखी समाधानी राहावी अशी प्रार्थना गणरायाच्या चरणी केल्याने मनसेने ते दिलीप धोत्रे यांनी सांगितले.

यावेळी बोलताना भैरवनाथ शिवाजी चेअरमन आणि सावंत यांनी या उपक्रमाचे कौतुक केले.

यावेळी पंढरपूर मच्छर बँकेचे उपाध्यक्ष आदित्य फत्तेपुरकर माजी नगरसेवक किरण घाडगे, नगरसेवक लंकेश यादव, श्याम भोगाव शशिकांत पाटील अनिल बागल गणेश पिंपळनेर गणेश इंगोले दिनेश पांढरे पिंटू गायकवाड संतोष वाघमारे दादा घोडके लखन भांडेकर संतोष गायकवाड शफी मुलानी जमीर सय्यद सुदर्शन पाटोळे समाधान पाटोळे श्रीकांत शिंदे यांच्यासह नागरिक व मनसे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वैनतेय विद्यामंदिरात ‘एक दिवस रद्दीचा’ उपक्रम उत्साहात

**दप्तरमुक्त शनिवारी चिमुकल्यांनी रद्दीतून साकारल्या आकर्षक टोप्या.**

निफाड प्रतिनिधी

विद्यार्थ्यामध्ये कल्पकता, सर्जनशीलता आणि पर्यावरण पूरक वस्तूंचा वापर करण्याची सवय निर्माण व्हावी या उद्देशाने दप्तरमुक्त शनिवार अंतर्गत निफाड येथील वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर शाळेत 'एक दिवस रद्दीचा' हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला.

मुख्याध्यापक गोरख सानप यांनी विद्यार्थ्यांना घरातील तसेच शाळेतील रद्दी पेपरचा वापर करून आकर्षक व रंगीबेरंगी टोप्या, विमान, होडी, झुंबर, पताका, चेंडू कागदी पिशव्या, पंखा इत्यादी वस्तू तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. विद्यार्थी रद्दी पेपरच्या विविध वस्तू तयार करण्यात रममाण झाले.

पेपर च्या टोप्या परिधान करून विविध कृतीगीतांवर मुलांनी ठेका धरला.

कच-यातून कलाकृती सादर करून विद्यार्थ्यांना रद्दी पेपरचा पुर्नवापर करून पर्यावरण रक्षणाचा संदेश देत राबविलेल्या या उपक्रमाचे न्यायमुर्ती रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, ड दिलीप वाघावकर, राजेश सोनी, प्रभाकर कुयटे, मधुकर राऊत, विश्वास कराड, नरेंद्र नांदे निफाड पंचायत समिती शिक्षण विभागाचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी एल. के. भरसट, कैलास बोरसे, नवनाथ सुडके,केंद्रप्रमुख सुरेश धारराव व पालकांनी कौतुक केले.

रद्दी पेपर चा वापर करून,



विनाखर्चिक वस्तूंचा वापर करून आपण विद्यार्थ्यांना आनंददायी पद्धतीने शिक्षणाच्या प्रवाहात आणू शकतो. विद्यार्थ्यांच्या नवनिर्मीतीला चालणा देणारा उपक्रम कौतुकास्पद आह, असे न्यायमुर्ती रानडे विद्याप्रसारक मंडळाचे अध्यक्ष वि. दा. व्यवहारे म्हणाले.



## अक्कलकोट शहरातील शाही ईदगाह मैदानावर नमाज ए इस्तिस्का पावसासाठी विशेष नमाज पठण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट शहरासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात पावसाने मोठी ओढ दिल्याने शेतकरी, नागरिक आणि मूक जनावरांच्या चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाळ्याचे जवळपास तीन महिने उलटूनही अपेक्षित पाऊस न झाल्याने निर्माण झालेल्या संकटातून दिलासा मिळावा आणि अल्लाहची रहमत म्हणून समाधानकारक पाऊस बरसावा, यासाठी आज अक्कलकोट शहरातील शाही ईदगाह मैदानावर नमाज-ए-इस्तिस्का पठाण करण्यात आली.

पावसासाठी अदा करण्यात येणारी दोन रकात विशेष नमाज श्रद्धेने पार पडली.

नमाजनंतर खुतबा पठण करण्यात आले त्यानंतर अक्कलकोट शहरासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यात तसेच देशातील ज्या-ज्या भागात पावसाची कमतरता आहे, त्या सर्व ठिकाणी समाधानकारक पाऊस पडावा,यासाठी अल्लाहकडे विशेष दुआ करण्यात आली.

या विशेष नमाज व दुआसाठी लहान मुले, तरुण, वयस्कर व्यक्ती तसेच मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने शाही ईदगाह मैदानावर उपस्थित होते पावसासाठीच्या या सामूहिक नमाज व दुवा प्रार्थनेत प्रत्येकाच्या चेहऱ्यावर पावसाची आस आणि मनात अल्लाहच्या रहमतीची अपेक्षा दिसून आली.

यावेळी शेतकऱ्यांच्या पिकांना जीवदान मिळावे, शेतीला आवश्यक पाणी मिळावे, मूक जनावरांना चारा-पाणी उपलब्ध व्हावे आणि पावसाअभावी निर्माण झालेल्या संकटातून नागरिकांना दिलासा मिळावा, यासाठी आर्त दुआ करण्यात आली.

तसेच भारत देशात सुख-शांती, प्रेम, आपुलकी व बंधुभाव कायम राहावा, सर्व धर्मीयांनी एकमेकांच्या धर्माचा आदर करावा आणि सर्व सण-उत्सव शांततेत पार पडावेत, यासाठीही विशेष प्रार्थना करण्यात आली.

इस्लामच्या शिकवणीनुसार जेव्हा समाजात पापांचे प्रमाण वाढते, तेव्हा त्याचा परिणाम अल्लाहच्या रहमतीवरही होतो, असे मानले जाते. अशा वेळी प्रत्येकाने आपल्या पापांची मनापासून तौबा (पश्चात्ताप) करून अल्लाहकडे क्षमा मागावी आणि त्याच्याकडे रहमत म्हणून पावसाची याचना करावी, अशी पैगंबर मुहम्मद (सल्लल्लाहु अलैहि वसल्लम) यांची शिकवण आहे. त्यानुसार ‘सलातुल इस्तिस्का’ ही विशेष नमाज अदा केली जाते. या नमाजनंतर संपूर्ण देशात दुष्काळाची परिस्थिती निर्माण होऊ नये, शेतशिवार हिरवेगार व्हावेत, जलस्रोत तुडुंब भरावेत आणि अल्लाहने संपूर्ण सृष्टीवर आपली कृपा करावी, अशी सामूहिक दुवा मौलाना यांनी केली.

पावसाची आतुरतेने वाट पाहणाऱ्या शेतकरी आणि नागरिकांच्या आशा या सामूहिक दुआतून व्यक्त झाल्या. अल्लाह तआला आमच्या दुआ कबूल फरमावो,अक्कलकोट शहरासह संपूर्ण सोलापूर जिल्ह्यावर रहमतचा पाऊस बरसवो आणि शेतकरी नागरिक व मूक जनावरांना या संकटातून दिलासा देवो अशी भावपूर्ण दुआ यावेळी करण्यात आली अशी माहिती सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांनी दिली.

### परिचारकांच्या विचारांचा वारसा जपत ग्रामविकासासाठी सातत्याने कार्यरत

### लक्ष्मण तात्या धनवडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन

## राजकीय कटुतेला थारा न देता जनसेवेचा मार्ग स्वीकारला : लक्ष्मण तात्या धनवडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर,: कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक यांनी जपलेल्या सामाजिक बांधिलकी, विकासाभिमुख विचारांचा वारसा पुढे नेताना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसलेल्या माझ्यासारख्या सर्वसामान्य कुटुंबातील कार्यकर्त्याला माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी सातत्याने बळ आणि मार्गदर्शन दिले. त्यामुळे ग्रामपातळीवर काम करताना कोणतीही राजकीय कटुता मनात न ठेवता सर्वसामान्य जनतेची कामे करण्याचा प्रयत्न केला. आज वाढदिवसानिमित्त नारायण चिंचोली व भैरवनाथवाडी परिसरातील ग्रामस्थांनी प्रेम, आपुलकी आणि आशीर्वादरूपी केलेला सन्मान ही माझ्यासाठी मोठी कमाई असून, या ऋणातून कधीही उतराई होता येणार नाही, असे भावनिक प्रतिपादन कर्मयोगी सुधाकरपंत परिचारक सहकारी साखर कारखान्याचे संचालक लक्ष्मण तात्या धनवडे यांनी केले.

नारायण चिंचोली व भैरवनाथवाडी ग्रामस्थांच्या वतीने लक्ष्मण तात्या धनवडे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने त्यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी परिसरातील ग्रामस्थ, युवक, ज्येष्ठ नागरिक, कार्यकर्ते व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना धनवडे म्हणाले की, सामान्य कुटुंबातून पुढे येताना कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसतानाही परिसरातील जनतेने माझ्यावर विश्वास ठेवला. ज्येष्ठांचे आशीर्वाद आणि तरुण कार्यकर्त्यांची साथ यामुळेच आजपर्यंतचा प्रवास घडत गेला. माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत, विविध सहकारी संस्था तसेच श्री सूर्यनारायण देवस्थानच्या माध्यमातून परिसराच्या विकासासाठी काम करण्याची संधी मिळाली.

गावपातळीवरील राजकारण करताना मतभेद असू शकतात; मात्र मनभेद आणि राजकीय कटुता निर्माण होऊ नये, ही भूमिका आपण कायम ठेवली



असल्याचे धनवडे यांनी स्पष्ट केले. विकासाच्या कामात राजकीय मतभेद बाजूला ठेवून गावातील सर्व घटकांना सोबत घेण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेच आज विविध विचारांचे ग्रामस्थ आपुलकीने वाढदिवसानिमित्त एकत्र आले, हीच आपल्या कामाची खरी पावती असल्याचे त्यांनी सांगितले.

परिसरातील युवक कार्यकर्त्यांनी वेळोवेळी दिलेली साथ आणि ज्येष्ठांनी दिलेले मार्गदर्शन ही आपली मोठी ताकद आहे. ग्रामविकासाच्या कामात युवकांचा सहभाग वाढला पाहिजे. गावातील प्रश्न सोडविण्यासाठी एकजुटीने प्रयत्न केले, तर विकासाची गती निश्चितच वाढू शकते, असेही धनवडे यांनी सांगितले. वाढदिवसानिमित्त आयोजित सामाजिक उपक्रमांमुळे कार्यक्रमाला सामाजिक बांधिलकीची किनार लाभली. केवळ वाढदिवसाचा सोहळा न करता समाजोपयोगी उपक्रमांच्या माध्यमातून तो साजरा करण्याची ग्रामस्थांची भूमिका विशेष ठरली.

शेवटी धनवडे यांनी नारायण चिंचोली, भैरवनाथवाडी तसेच परिसरातील ग्रामस्थांचे आभार मानत, आजपर्यंत ज्याप्रमाणे आपले प्रेम, विश्वास आणि आशीर्वाद मिळाले, त्याचप्रमाणे भविष्यातही आपले आशीर्वाद कायम पाठीशी राहावेत. जनतेच्या विश्वासाला तडा जाऊ न देता विकास आणि जनसेवेचे काम पुढे सुरू ठेवू, अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमास परिसरातील ग्रामस्थ, युवक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, विविध संस्थांचे पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.